# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18

## अ प्रभाग समिती

### सभावृतांत [ कार्यपत्रिका क्रमांक 9 ]

**दिनांक : 9/2/2018** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे मुळ अंदाजपत्रकासंबंधी अ प्रभाग समितीची विशेष सभा शुक्रवार दि.9/2/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. केशव हनुमंत घोळवे | सभापती |
| 2. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सदस्या |
| 3. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. | मा. वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 5. | मा. प्रमोद कुटे | सदस्य |
| 6. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 7. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 8. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 9. | मा. शितल उर्फ विजय गोरख शिंदे | सदस्य |
| 10. | मा. बाबू नायर | स्वीकृत सदस्य, [पिंपरी चिंचवड महानगरपालिका] |

याशिवाय श्रीम. आशादेवी दुरगुडे – मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री. सतिश इंगळे – मा. कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. विशाल कांबळे - मा.कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा, श्री. सतिश खाबडे – मा. कार्यकारी अभियंता विदयुत, श्री. आर.के.लटपटे – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री संजय काशीद, श्री. सुभाष काळे, श्री लक्ष्मीकांत कोल्हे, श्री. चंद्रकांत मुठाळ, – उपअभियंता, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री कदम पी.जे. – लेखाधिकारी, श्रीम. साळुंके अस्मिता, श्री. पाटील एस.पी., श्री. सचिन लोणे, - कनिष्ठ अभियंता, श्रीम व्ही.एस. ठोंबरे – उपलेखापाल, इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. केशव हनुमंत घोळवे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. मा. क्षेत्रीय अधिकारी, श्रीम आशादेवी दुरगुडे यांनी अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे मुळ अंदाजपत्रक मा. प्रभाग समितीसमोर अवलोकनार्थ सादर केले.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक 165 | विषय क्रमांक 1 |
| दिनांक 9/2/2018 | विभाग : लेखा |
| सुचक: मा. शैलजा मोरे | अनुमोदक : मा. राजू मिसाळ |

संदर्भ :- मा. क्षेत्रीय अधिकारी यांचेकडील पत्र क्र. अक्षेका/लेखा/कावि/34/2018
दि. 6/2/2018 रोजीचा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यालयाचे सन 2017-18 चे सुधारित व सन 2018-19 चे मुळ अंदाजपत्रकाचे अवलोकन करण्यात आले असून पुढील मान्यतेकामी शिफारस करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

मा. केशव घोळवे, सभापती यांनी वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणेत आली असून यामध्ये सन्मा. सदस्यांना त्यांचे प्रभागामधील आणखी काही कामे सुचवावयाची असल्यास त्याप्रमाणे आजच लेखी स्वरुपात माहिती दयावी. त्यानुसार लेखा विभागामार्फत मुख्यालयाकडे पाठविणेत येतील अशा सुचना देण्यात आल्या. त्यानंतर सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची विशेष सभा संपल्याचे जाहीर केले.

[ केशव हनुमंत घोळवे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/11/कावि/34/2018 दि 12/2/2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,

सर्व संबंधित -----------------------